REGISTERED No. B. 3434




# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १४ पुणें, बुधवार तारीख १५ सप्टेंबर, १९४८ अंक ३७


## दि रत्नाकर बँक, लि.

स्थापना : १९४३

**–: शाखा :–**

(१) कोल्हापूर, (२) शाहुपुरी, (३) सांगली, (४) मिरज, (५) जयसिंगपूर.

| | | रु. |
|---|---|---|
| अधिकृत शेअर भांडवल | ... | १०,१२,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ... | ६,२७,२०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ... | ३,१३,६०० |
| रिझर्व्ह फंड | ... | २०,००० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) | ... | ३८,००,००० |

—अद्यावत बँकिंग व्यवहार केले जातात—

नामदार बी. बी. पाटील. B. A., LL. B., डेव्हलपमेंट मिनिस्टर, सांगली स्टेट. चेअरमन

श्री. गं. सि. चौगुले. M. L. A. कोल्हापूर व्हा. चेअरमन

एल. एन्. शहा. B. Com., C. A. I. I. B. मॅनेजर

## दी बँक ऑफ कोल्हापूर, लि.

एच. एच. दी छत्रपति महाराजा ऑफ कोल्हापूर ह्यांचे सरकारचे आश्रयाखालील व त्याचा फार मोठा पाठिंबा मिळत असलेली.

[ *कोल्हापूर येथें नोंदलेली व भागिदारांची जबाबदारी मर्यादित असलेली.* ]

स्थापनाः १९२६

मुख्य कचेरी :

सर बर्डवुड रोड, लक्ष्मीपुरी, कोल्हापूर.

तार : BANKOP फोन : २८९

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | ४०,०६,५०० रु. |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | २०,२६,००० रु. |
| वसूल | १०,१३,००० रु. |
| रिझर्व्ह फंड | ७,८६,००० रु. |
| खेळतें भांडवल | १,८८,००,००० रु. हून अधिक |

शाखा :

(१) गुजरी (२) शाहुपुरी–कोल्हापूर (३) मलकापूर (४) पेठ वडगांव (५) जयसिंगपूर (६) इचलकरंजी (७) गडहिंग्लज (८) निपाणी (जि. बेळगांव) (९) मुंबई (१०) मांडवी–मुंबई.

—बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात—

मुख्य कचेरींतील रेफ डिपॉझिट लॉकर्सच्या उत्तम व्यवस्थेचा फायदा घ्या.

व्ही. ए. सावंत, जनरल मॅनेजर.

## दि सेन्ट्रल म्युच्युअल विमा कंपनी, लिमिटेड

हेड ऑफिसः—लालगीर चेंबर्स, फोर्ट, मुंबई.

★ नव्या कामाचे मोठे आकडे हेंच केवळ विमा कंपनीच्या यशाचें खरें गमक नव्हे. विमेदारांची योग्य निवड, काटकसरीची शास्त्रशुद्ध पण चोख व्यवस्था याचीच या धंद्यास खरी जरूरी आहे.

आमचा कारभार वरील तत्त्वानुसारच चालतो, याची आजच खात्री करून घ्या.

शं. न. आगाशे
मॅनेजिंग डायरेक्टर

—महाराष्ट्रांतील—

प्रगमनशील व अग्रेसर विमा संस्था

## दि औंध म्युच्युअल इन्शूरन्स सोसायटी लि. पुणें २

—*आमची वैशिष्ट्यें*—

(१) काटकसरीचा कारभार (२) खर्चाचें अल्प प्रमाण (३) क्लेम्स तावडतोब पटविणें (४) एजंटास कायमचें व वंशपरंपरागत कमिशन (५) माफक हप्त्याचे दर.

विमा अथवा एजन्सी यासाठीं लिहा अगर भेटा.

—मॅनेजिंग डायरेक्टर

# मशिनरी खरेदीचा प्रश्न

कोणतीहि मशिनरी खरीदण्यापूर्वी आमचा सल्ला घ्या. आमचें सहकार्य आपल्या नेहमींच फायद्याचें ठरेल.

लेथ्स, ड्रिलिंग मशिन्स, ऑइल एंजिन्स, वगैरेचे विक्रेते.

केळकर बंधू, बुधवार चौक. पुणें २.


## विविध माहिती

**हिंदुस्थानांतील तुपाचें उत्पादन**—हिंदुस्थानांत दरवर्षी सुमारें ५ लाख टन तूप उत्पन्न करण्यांत येतें. त्याची किंमत मणाला ५५ रुपये प्रमाणें सुमारें ७७ कोटी रुपये होते. एकंदर उत्पादनापैकीं ६२ टक्के उत्पादन प्रांतांतून आणि बाकीचें संस्थानांतून होतें. उतरत्या क्रमानें उत्पादनांत पुढीलप्रमाणें श्रेणी लागते. पंजाब १५·७ टक्के; संयुक्तप्रांत १३·८ टक्के; मद्रास ९·८टक्के आणि बिहार ५·४ टक्के. एकूण उत्पादनापैकीं ३० टक्के उत्पादन उत्पादक वर्ग स्वतःसाठी ठेवतात व बाकीचें ७० टक्के विकतात. हिंदुस्थानांत दरमाणशीं तूप खाण्याचें सर्वांत अधिक प्रमाण ग्वाल्हेर व सिंधमध्यें आहे. सर्वांत कमी प्रमाण बंगालमध्यें आहे.

**अमेरिकेंतील आयुर्विमा व्यवसाय**—१९४८ सालच्या पहिल्या सहा महिन्यांत अमेरिकेंतील आयुर्विमा व्यवसायानें उच्चांक गांठला आहे. ह्या सहामाहींत अमेरिकेंतील कुटुंबांनीं गेल्या दोन वर्षांतल्या प्रमाणेंच मोठ्या प्रमाणावर विमे उतरलेले आहेत. १९४१ सालापेक्षा आज दुपटीनें अधिक विमे उतरण्यांत येत आहेत. त्यांतही व्यक्तींच्या गटांचे विमे अधिक उतरविले जात आहेत. युद्धपूर्वकालापेक्षां अशा विमापत्रकांची तिपटीनें वाढ झाली आहे.

**निकामी लोखंड-पोलाद जमविण्याची मोहीम**—युद्धांत अमेरिकेनें फार मोठ्या प्रमाणावर दारूगोळा परदेशीं पाठवला. त्यामुळें देशांतील निकामी पोलादाचा व लोखंडाचा सांठा बराच कमी झाला आहे. आतां देशांतील ह्या निकामी धातूंचा सांठा जमविण्याची व बाहेरूनहि निकामी लोखंड-पोलाद आयात करण्याची मोहीम अमेरिकेच्या व्यापारी खात्यानें सुरू केली आहे. सध्या अमेरिकेंतील निकामी लोखंड-पोलादाचा सांठा ५० लाख टनापेक्षाही कमी आहे. १९४० सालीं हा साठा ८० लाख टनाइतका होता.

**हिंदसाठी नैट्रोजन (खत)**—इंटरनॅशनल इमर्जन्सी फुड कमिटीनें ३० जून १९४८, सालीं पुऱ्या झालेल्या वर्षासाठीं हिंदुस्थानला ३९, ३४५ मेट्रिक टन्स नैट्रोजन मंजूर केला आहे. हिंदुस्थानची ह्या वर्षाची गरज मात्र ७६,३९४ टनांची होती.

**बिहारमध्यें कर-वाढ**—बिहार सरकार मोटार सायकलवरील कर १० टक्के, व्यापारांत गुंतलेल्या गाड्यावरील कर २५ टक्के आणि खाजगी मोटारीवरील कर १०० टक्के वाढविण्याचा विचार करीत आहे. ह्या करांच्या उत्पादनाचा उपयोग स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रांतील रस्ते सुधारण्याकडे करण्यांत येणार आहे.

**बोलपटावरील जकातींत वाढ**—चीनच्या सरकारनें, प्रत्येक अमेरिकन बोलपटावरील जकात २५० डॉलर्स होती ती सुमारें १,२०० डॉलर्स पर्यंत वाढविली आहे. अमेरिकन चित्रपट-निर्मात्यांनीं ह्या बाबतींत अमेरिकेच्या परराष्ट्रीय खात्याकडे तक्रार नोंदविली आहे.

**सिमेंटचें उत्पादन**—हिंदुस्थानांतील सिमेंटच्या कारखान्यांची वार्षिक उत्पादनक्षमता सुमारें २० लाख टन आहे, प्रत्यक्ष उत्पादन मात्र घटत चाललें आहे. १९४३ सालीं सिमेंटचें उत्पादन १६,९८,८१५ टन झालें आणि आतां तर तें १४,४१,३३५ टनापर्यंत खालीं उतरलें आहे.

**रेल्वेच्या डब्यांचे नवे वर्ग**—हिंदी रेल्वेजवर ता. १ जानेवारी १९४९ पासून फक्त तीनच वर्ग रहाणार आहेत. एक 'अपर' दुसरा 'इंटर' आणि तिसरा 'ऑर्डिनरी'. 'अपर' वर्गाच्या तिकिटाला दर मैलाला २ आणे प्रमाणें आकार घेण्यांत येईल. सध्यां पहिला वर्ग व दुसरा वर्ग ह्यांना दरमैली जो आकार घेण्यांत येतो त्याच्या दरम्यानचा हा दर आहे. 'इंटर' व 'ऑर्डिनरी' वर्गाच्या भाड्यांत बदल करण्यांत येणार नाहीं. झोंपण्याची सोय फक्त 'अपर' वर्गातील प्रवाशांकरिता व जादा आकार घेऊन 'इंटर'च्या प्रवाशांसाठीं करण्यांत येणार आहे. स्टेशनांचीं नांवें देवनागरी लिपींत लिहिलीं जातील.

**मद्रासमधील दारूबंदी**—मद्रास सरकारनें दारूबंदीची योजना मद्रास शहर आणि उरलेले आठ जिल्हे ह्यांतही चालू करण्याचें ठरविलें आहे. आज १६ जिल्ह्यांतून दारूबंदीचा कार्यक्रम अंमलांत आणलेला आहेच. ऑक्टोबरच्या २ तारखेपासून सर्वच मद्रास प्रांत दारूच्या दृष्टीनें कोरडा होईल.

**पाकिस्तान टोबॅको कंपनी**—इंपीरिअल टोबॅको कंपनीचें हें अपत्य कराची येथें मोठ्या प्रमाणावर लवकरच सिगारेट्सच उत्पादन सुरू करणार आहे. कंपनीचें वसूल भांडवल ५कोटी रुपये असून तिचा कारखाना सबंध आशियांतील सर्व कारखान्यांत मोठा होईल.

**टिटाघर पेपर मिल्स कं. लि.**—ह्या कंपनीनें ३१-३-४८ अखेरच्या वर्षी १ कोटी, ५५ लक्ष रुपयांची विक्री करून २५½ लक्ष रुपये निवळ नफा मिळविला.

**अमेरिकेची परदेशांतील गुंतवणूक**—अमेरिकेच्या परदेशांतील गुंतवणूकींत १९४७ सालीं ८ अब्ज, १० कोटी डॉलर्सची भर पडून एकूण गुंतवणुकीची रकम २८ अब्ज, ८० कोटी डॉलर्सवर गेली. ह्या रकमेपैकी सरकारी गुंतवण सुमारें १२ अब्ज डॉलर्सची असून बाकीची खासगी आहे.

**"साखरेचा सांठा करूं नका"**—बॉंबे शुगर मर्चंटस असोसिएशननें, जनतेनें-विशेषतः श्रीमंत लोकांनीं—साखरेचा सांठा करूं नये अशी विनंती केली आहे. सध्या साखरेचे कारखानदार आपल्या जवळील शिलकी साखर वाटेल त्या मार्गानें विकूं इच्छित आहेत. थोड्या कमी दरानें त्यांनीं कांहीं साखर पाकिस्तानला विकली. पण परदेशी साखरेच्या किंमती हिंदी साखरेपेक्षां जवळ जवळ निम्यानें कमी असल्यामुळें पाकिस्तान आता हिंदी साखर घेत नाहीं. अशा परिस्थितींतें, साखर शिलक असतांना तीवर नियंत्रण बसण्याची शक्यता नाहीं, असें वरील पत्रकांत म्हटलें आहे.


तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें

-सर्व प्रांतांतील- सुती – गरम – रेशमी —खादीचें माहेरघर— **खादी मन्दिर** २६२, बुधवार पेठ, दमडेरे बोळाजवळ पुणें २

# अर्थ

बुधवार, ता. १५ सप्टेंबर १९४८



प्रो. वा. गो. काळे

संपादक : श्रीपाद वामन काळे

वा. वर्गणी ट. ख. सह ६ रु. किरकोळ अं. २ आणे.


## बँकिंग बिलांतील बंधनांची पार्श्वभूमि

### रोगांचें निर्मूलन करण्याची आवश्यकता

हिंदी बँकिंगच्या व्यवसायाचें नियंत्रण करणारा एक स्वतंत्र कायदा आवश्यक आहे, ही गोष्ट फार पूर्वीपासून सर्वमान्य झालेली आहे. बँकिंग इनक्वायरी कमिटीनें असा कायदा सत्वर होण्याविषयीं सूचना केली होतीच. परंतु अनेक कारणांमुळें हें काम दीर्घ काळ लांबणीवर पडत गेलें, आणि स्वातंत्र्यप्राप्तीनंतर एक वर्ष लोटल्यावर आतां बँकिंगचा कायदा समीप आला आहे. नोव्हेंबर, १९४४ मध्यें एक बिल मध्यवर्ती असेंब्लींत मांडण्यांत आलें होतें; पुढें तें सिलेक्ट कमिटीकडेहि सोपविण्यांत आलें होतें. परंतु, कमिटीनें त्याचा विचार करण्यापूर्वीच तें रद्द (लॅप्स) झालें. एक नवें बिल मार्च, १९४६ मध्यें मांडण्यांत येऊन सिलेक्ट कमिटीकडे सोपविण्यांत आलें. फेब्रुवारी, १९४७ मध्यें सिलेक्ट कमिटीनें आपला रिपोर्ट सादर केला, परंतु नव्या घटना समितीनें त्याचा विचार करण्याऐवजी स्वतंत्र नवें बिलच तयार करणें श्रेयस्कर ठरलें. ह्या बिलानें बँकिंग कंपन्यांचा व्यवहार नियंत्रित करण्याच्या उद्देशानें त्यांचेवर अनेक बंधनें सुचविलीं आहेत.

बँकिंग बिलांचें कायद्यांत रूपांतर होण्याच्या मध्यंतरींच्या काळांत कित्येक हिंदी बँकांना अयोग्य मार्गांनीं जाण्याची संधी मिळाली आणि त्या संधीचा कांहींनीं दुरुपयोगहि केला. त्यामुळें बिलाचीं मूळ कलमें अधिकाधिक कडक करणें आवश्यक झालें. युनायटेड कमर्शिअल बँक लि. चे डे. ज. मॅनेजर श्री. व्ही. आर. सोनाळकर ह्यांनीं आपल्या एका लेखांत बँकिंग बिल आवश्यक कां झालें ह्याचीं कारणें सांगतांना कांहीं उद्बोधक माहिती व उदाहरणें दिलीं आहेत. मोठ्या बँकांनीं आपल्या मुदती ठेवींवरील व्याज उतरविलें त्यामुळें लहान बँका ज्यास्त व्याज देऊं करून ठेवी आकर्षू लागल्या. युद्धकाळांत फाजील चलनविस्तार होऊन पैसा मुबलक झाला आणि शेअर बाजारांतील शेअर्सच्या व सरकारी रोख्यांच्या किंमती वाढत चालल्या. त्यामुळें बँकांना त्या बाजारांत सोडतीचे व्यवहार करण्याची संवय लागली आणि चलती होती तोंवर त्यांना फायदा मिळत गेला. प्रचंड जाहिराती देऊन ठेवी जमा करीत असतांना, खर्चाच्या बाजूकडे त्यांचें दुर्लक्ष झालें. शाखांची संख्या तर इतकी वाढली, कीं बाजारपेठेंत १०-१२ बँकांच्या पाट्या असणाऱ्या इमारती एक सोडून एक आढळूं लागल्या! परंतु, हें होण्यापूर्वींच कांहीं बँकांचे व्यवहार कनिष्ट कोटीस पोचले होते. खालीं त्यांचीं कांहीं उदाहरणें दिलीं आहेत:—

(१) एका बँकेनें कांहीं माल खरेदी केला, त्याचे पैसे देण्यासाठी पे ऑर्डर काढली. ती पे ऑर्डर दुसऱ्या बँकेकडे वसुलीसाठी आली, तेव्हां पैसा देण्यास सवड मागणारीं अनेक पत्रें तिनें लिहिलीं. (२) कलकत्ता येथील एका बँकेवर तिच्या शाखेनें ड्राफ्ट काढला त्याचे पैसे देण्याचें तिनें दीर्घ काळ नाकारलें. ड्राफ्टबाबत शाखेकडून लिहून न आल्याची सबब ती बँक दोन आठवडे सांगत होती. (३) एका मोठ्या बँकेनें दुसऱ्या एका बँकेच्या शाखेकडे वसुलीसाठीं बिल पाठविलें. त्या बिलाची वसुली तिनें केली तरी तिनें मूळ बँकेस पैसे दिले नाहींत. शाखेच्या कलकत्ता येथील मुख्य कचेरीकडे तक्रार करतां, "हा व्यवहार तुम्हीं व शाखा ह्यांचेमधील असल्यानें, आम्हीं त्यांत पडूं शकत नाहीं" असें उत्तर मिळालें. (४) मॅनेजर परगांवीं गेला असल्याच्या सबबीवर एका बँकेनें तिचेवरील चेक्सचे पैसे देण्याचें टाळलें. बँकेच्या कचेरींत पट्टेवाल्याखेरीज कोणीच तीन दिवस नव्हता. (५) एका बँकेनें व्यवहार बंद केला, तेव्हां खालील प्रकार उघडकीस आला. दुसऱ्या बँकांकडून पोस्टानें चेक आले, त्यांचे पैसे ह्या बँकेच्या खातेदारांच्या नांवें लिहिले होते, परंतु त्या बँकांना मात्र रकमा धाडलेल्या नव्हत्या. ज्या खातेदारांचें नुकसान झालें, त्यांची भरपाई करण्याइतकीहि जिंदगी लिक्विडेटरचे हातीं आली नाहीं. (६) एका बँकेकडे तिच्या गिऱ्हाइकांचे रोखे सेफ कस्टडीसाठी आले असतांना, तिच्या मॅनेजिंग डायरेक्टरानें ओव्हरड्राफ्ट घेण्यासाठी इतर बँकांना ते तारण लावून दिले.

अशा तऱ्हेचे व्यवहार वाढत्या प्रमाणावर घडूं लागले आणि त्यांस वेळींच पायबंध घातला नाहीं तर सबंध बँकिंग क्षेत्रच बिघडण्याची भीति निर्माण झाली. रिझर्व्ह बँक बँकांच्या मदतीस धावून जात नाहीं अशी तक्रार ऐकूं येते. परंतु बँकिंगचे साधे नियमहि न पाळणाऱ्या बँकांना मदत तरी कशी आणि कोण करूं शकणार? कायदा केल्यानें केवळ बँकांचे हे व्यवहार तात्काळ सुधारतील, असें मुळींच नाहीं. बँकिंग बिलानें रिझर्व्ह बँकेस तपासणीचे व्यापक अधिकार दिले आहेत, परंतु बँकांच्या रोजच्या व्यवहारांवर देखरेख ठेवण्याचें तिचेवर कायदेशीर बंधन नाहीं. चांगल्या बँका आपण होऊन पाळीत असलेल्या नियमांचे पलीकडे बँकिंग बिलाचीं बंधनें गेलेलीं नाहींत आणि सहाजीकच त्यांच्या व्यवहारास नव्या कायद्यानें अडथळा येणार नाहीं. बँकिंग बिलांतील कलमांची छाननी करतांना श्री. सोनाळकर ह्यांनीं बँकांचे कित्येक कावे स्पष्ट करून दाखवले आहेत आणि उपाययोजना कशी आवश्यक झाली हें स्पष्ट केलें आहे. नव्या शाखा उघडून ठेवी मिळविण्यासाठीं बँकांनीं कशी धडपड चालविली होती, तिचें त्यांनीं केलेलें वर्णन मनोरंजक आहे.

### पुणें सें. को. बँक लि.चे नवे चेअरमन

बँकेची वार्षिक सभा व निवडणूक ता. १२ रोजीं झाली. श्री. यशवंत धोंडो ओगले ह्यांची नव्या वर्षाकरितां चेअरमन म्हणून एकमतानें निवड झाली.

### प्रवाशांचा धंदा व हिंदुस्थान

वरील विषयावर श्री. श्री. वा. काळे, संपादक "अर्थ", ह्यांचें मुंबई रेडिओवर ता. १८ सप्टेंबर रोजीं दुपारीं 'नभोवाणीचे परिसरांत' ह्या कार्यक्रमांत भाषण होणार आहे.

## सहकारी चळवळीचें भावी स्वरूप

### प्रा. ओतुरकर ह्यांची, स्पष्ट भूमिकेची मागणी

संपादक, " अर्थ " ह्यांस

सप्रेम कृ. सा. न. वि. वि. आपल्या ता. २८ ऑगस्टच्या अंकांतील श्री. य. द. खोले ह्यांचा वरील विषयावरील लेख समग्र वाचला. त्यांचें मन निश्चित प्रा. गाडगीळ यांच्या शिफारसींकडे आहे पण फिरून नव्या घटनेस 'यश चिंतण्याचें नैतिक कर्तव्य' ते करीत आहेत! पण एवढ्यानें भागत नाहीं.

मुंबई इलाख्यांत शेतकऱ्यास लागणारें कर्ज सहकारी संस्थांमार्फत द्यावयाचें ठरलें तर त्यासाठीं सध्याच्या सहकारी संस्थांतून कशा प्रकारची पुनर्घटना व वाढ करावी लागेल, तिचा कार्यक्रम कोणता, याचा खल होणें हा आतां खरोखर महत्त्वाचा प्रश्न आहे. श्री. खोले ह्यांचें असें स्वच्छ मत आहे का, कीं सहकारी संघटनेला हें झेपणार नाहीं?

माझ्या म्हणण्याचा आशय असा कीं, यापुढें सहकारी चळवळीच्या खऱ्या हितचिंतकांनीं कृत्रिम गोडवेपणानें एकमेकांस आशीर्वाद देण्याचें सोडून द्यावें. इंग्रजी राज्यांत सहकारी चळवळींत पेन्शनर्स, रावसाहेब, रावबहादूर हे हौसेनें भाग घेत व त्यावेळच्या पद्धतीप्रमाणें थोडेंबहुत काम करून लोकांत नांव व सरकारमध्यें बरेपणा संपादन करीत. सरकारलाही जनतेस चळवळ्या लोकांपासून दूर ठेवण्यासाठीं अशा प्रकारची राजनिष्ठ सार्वजनिक कार्यकर्त्यांची 'आघाडी' उघडणें सोईचें होतें. 'परस्पर सहकार व स्वावलंबन' याच्या जयघोषांत फारसें कांहीं न करतां सहकारी चळवळीचा डोलारा उभारतां आला. त्यांत जें विधायक काम झालें, तें मुंबईतील भांडवलवाल्यांच्या एका शाखेनें समाजहितबुद्धीनें प्रांतिक सहकारी बँक स्थापन करून ग्रामीण व जिल्हा सहकारी पतपेढ्यांशीं सांधेजोड करून दिली त्यामुळें झालें. आतां यापुढें जुजबी काम करण्याचे दिवस संपले. आतां सरकारमान्य समाजसेवकांची निराळी आघाडी ठेवण्याचें कारण नाहीं. जनतेंतील कार्यकर्ते व सहकारी चळवळीचें रहस्य व मर्यादा समजणारे तज्ज्ञ या उभयतांनीं तपशीलांत शिरून कार्यक्रम आंखण्याची वेळ आली आहे, किंबहुना केव्हांच येऊन गेली आहे. सरकारला, परस्पर सहकाराच्या नांवाखालीं तटस्थ राहून चालणार नाहीं. सहकारी चळवळ जनतेंत रुजावयाची तर सरकारला भावनियंत्रण करून शेतीच्या व्यवहारांत स्थैर्य आणावें लागेल व बाजारपेठ तयार करण्यासाठीं सवलती द्याव्या लागतील.

सरकारप्रमाणें लोकांचेंहि कर्तव्य आहे व तेंच अधिक महत्त्वाचें आहे. यापुढें सहकारी संस्था ह्या ग्रामीण जीवनाच्या उद्धाराचें साधन बनणार असल्या, तर पुढील पांच वर्षांत त्यांची दुप्पट-तिप्पट वाढ करावी लागेल व त्यासाठीं कार्यक्षम नोकरांचा पुरवठा करावा लागेल. नाहींतर सहकारी चळवळीला आपलें रुटुखुटू काम करीत तूर्त तसेंच वाढूं देऊन सरकारनें ग्रामीण जीवनाच्या उद्धारासाठीं—प्रस्तुत त्यांना जरूर ती (क्रेडिट) पत व पैसा मिळवून देण्यासाठीं—स्वतंत्र मध्यवर्ती प्रांतिक संघटना उभारावी. माझ्या मतें सरकारनेंच हें काम हातीं घ्यावें. याचें स्पष्ट कारण असें कीं, सहकारी चळवळीचीं सूत्रें जेथून फिरतात व धोरण ज्यांच्या हातांत आहे त्या मध्यवर्ती संघटनेपर्यंत अजून शेतकऱ्यांचे व ग्रामीण जनतेचे खरेखुरे प्रतिनिधी पोहोंचले नाहींत. ग्रामीण उद्धाराचें कार्य हें समाजहितबुद्धि असणाऱ्या सहानुभूतिपूर्ण अशा भांडवलवाल्यांच्या हातीं जाण्यापेक्षां तूर्त तें सरकारच्या हातीं राहूं दे! माझें चुकलें असलें तर श्री. खोले ह्यांनीं माझें म्हणणें जोरदार शब्दांत खोडून काढावें. त्यानें झाला तर सर्वांचा फायदाच होईल.

"स्वातंत्र्य"
पुणें ४

आपला
रा. वि. ओतुरकर

---

## जिंदगीचें मूल्यमापन करून भांडवल वाढविण्याचें कंपन्यांचें धोरण

आपल्या जिंदगीस पूर्वीं फार थोडी किंमत पडली असल्यास, तिचा आजचा बाजारभाव काढून ह्या वाढलेल्या किंमतीनें जिंदगीची किंमत वाढवून दाखविण्याचें धोरण कांहीं कंपन्या अंगीकारत आहेत. जिंदगीची किंमत जेवढी वाढेल तेवढी रिझर्व्ह फंडांत भर घालावयाची आणि ह्या भरीच्या किंमतीचे बोनस शेअर्स भागीदारांना देऊन, भाग भांडवल वाढवावयाचें, असा हा द्राविडी प्राणायाम आहे. उदाहरणार्थ, दि कॅनर टी कंपनी लि. (कलकत्ता) ची स्थावर मालमत्ता १½ लक्ष रुपयांची होती. तिची चालू बाजारभावानें कंपनीनें किंमत करविली, ती ६ लक्ष रु. भरली. म्हणजे, ताळेबंदाच्या जिंदगीचे बाजूस ४½ रु. लक्ष वाढले आणि तेवढ्याच रकमेची देणें बाजूस रिझर्व्हमध्यें भर घालण्यांत आली. अशा रीतीनें जो रिझर्व्ह फंड वाढला, त्याचें भांडवलांत रूपांतर करण्यांत आलें आणि तें भागीदारांना बोनस शेअर्सच्या स्वरूपांत देण्यांत आलें. म्हणजे, वाढविलेल्या जिंदगीइतकेंच भरणा भांडवलहि वाढलें. एलेन बॅरी टी कं. लि. नेंहि अशाच रीतीनें १½ लक्ष रुपयांची स्थावर जिंदगी २½ लक्ष रु. केली, आणि वसूल भांडवलांतहि तेवढीच भर घातली.

सर्वसाधारण किंमतीच वाढल्या असतांना अशा रीतीनें जिंदगीची किंमत वाढवून दाखविणें सामान्यतः इष्ट समजलें जात नाहीं. परंतु, लहान भांडवलावर मोठा नफा सुटून डिव्हिडंडचा दर कामगारांच्या व सरकारच्या डोळ्यांत भरूं नये ह्यासाठी भांडवल वाढवून, डिव्हिडंडचा दर दिसण्यास लहान व मर्यादित राखणें कित्येक कंपन्यांना आतां आवश्यक वाटूं लागलें आहे. जिंदगी वाढविली म्हणजे तिचेवर घसाराहि अधिक काढतां येतो आणि अशा रीतीनें भागीदारांस भरमसाट नफा मिळत आहे असें सकृतदर्शनीं कोणीहि म्हणूं शकत नाहीं.

---

### संपदा

(मराठा चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज, पुणें, ह्या संस्थेनें चालविलेलें मासिक. संपादक : श्री. आ. रा. भट, एम. कॉम., वा. व. ६ रु.)

मराठा चेंबरनें चालविलेल्या ह्या मासिकाच्या सप्टेंबरच्या अंकांत व्यापारी—कारखानदारांनीं अंतर्मुख व्हावें, भांडवल मिळवण्याकरितां माहितीपत्रक, कंपनी—डायरेक्टरांच्या अधिकाराची व्याप्ती, कामगारांची नफ्यांतील भागीदारी, इत्यादि विषयांवर लेख आले असून स्फुट विचार, परदेशीय औद्योगिक क्षेत्रांत फेरफटका, स्वदेशांतील आर्थिक घडामोडी, वगैरे नेहमीचीं सदरेंहि आहेत. 'संपदा' चें संपादकत्व श्री. आ. रा. भट ह्यांचेकडे आहे, एवढ्यावरून "संपदे" मधील लिखाणाचा दर्जा व बिनचूकपणा ह्यांची खात्री बाळगण्यास हरकत नाहीं. चेंबर करीत असलेल्या भरीव कार्याचा महाराष्ट्रीय जनतेस परिचय करून देण्याचेंहि उपयुक्त कार्य हें मासिक करीत आहे. चेंबरच्या सभासदांस तें विनामूल्य मिळत असल्याकारणानें चेंबरचे सभासद झाल्यास सभासदत्वाचे इतर फायदे मिळून आणखी हें मासिकहि मिळूं शकतें. प्रस्तुत मासिकानें चेंबरच्या कार्यक्षेत्रांत व व्यापारी मासिकांत बहुमोल भर घातली आहे.

श्री. चांदोरकर

( १ ) ग्लास पॅनेल, गव्हर्नमेंट ऑफ इंडिया १९४६-४७ चे सभासद. ( २ ) ऑल इंडिया ग्लास मॅन्युफॅक्चरर्स फेडरेशनचे व्हाइस प्रेसिडेंट. ( ३ ) इंडियन ग्लास सेक्शन, सोसायटी ऑफ ग्लास टेक्नॉलॉजी, शेफील्ड, इंग्लंड, या संस्थेचे प्रेसिडेन्ट. ( ४ ) ऑल इंडिया सिरॅमिक सोसायटीचे प्रेसिडेन्ट. ( ५ ) ग्लास ॲन्ड रिफ्रॅक्टरीज् रिसर्च कमिटीचे सभासद.

# आपल्यापुढील प्रचलित औद्योगिक प्रश्न

## श्री. चांदोरकर ह्यांचे विचार

( श्री. स. वा. दातार )

मुंबईच्या विजय ग्लास वर्क्स, माझगांव या प्रसिद्ध काच कारखान्याचे मालक श्री. रामचंद्र दामोदर चांदोरकर यांची व माझी दिनांक १२-८-१९४८ रोजीं मुंबईत गाठ पडली होती. त्यावेळीं आमचें प्रचलित औद्योगिक प्रश्नांसंबंधीं बरेच बोलणें झालें; त्यावरून त्यांचे विचार येथें सादर करीत आहे.

### उत्पादन वाढवा

सध्यां, उत्पादन वाढवा असा फार जोराचा लकडा देशांतील पंडित जवाहरलालजींपासून सर्व पुढारी कारखानदारांचे मागें लावीत आहेत. परंतु उत्पादन वाढण्याऐवजीं घटतच चालल्याचा आज अनुभव येत आहे. याचें कारण काय ? असा प्रश्न मी प्रथम श्री. चांदोरकरांना विचारला. त्यावर ते म्हणाले, "याला सर्वांत मोठें कारण म्हणजे वाहतुकीच्या अडचणी ! वाहतुकीच्या अडचणीमुळें पक्क्या मालाचा उठाव होत नाहीं; एवढेच नव्हे तर कच्च्या मालाचा पुरवठाहि होऊं शकत नाहीं. सध्यां आमचा माल आम्हीं मुंबईबाहेर फारसा पाठवूंच शकत नाहीं. दक्षिण हिंदुस्थानांत आमचा खप फार मोठा, पण सध्यां तो स्थगित झाला आहे."

"मग यावर तुम्हीं उपाय काय सुचवितां?" असें मी विचारलें असतां श्री. चांदोरकर म्हणाले, "उत्पादन खरोखरीच वाढवावयाची सरकारची इच्छा असेल तर सरकारनें प्रत्येक कारखानदारास योग्य त्या प्रमाणांत कच्च्या मालाचा पुरवठा करावा व मग त्याजकडून त्या प्रमाणांत उत्पादन करून घ्यावें. जरूर तेथें सक्तीसुद्धां करावी. परंतु सहसा सक्तीची जरूर पडणारच नाहीं. कारखानदार आपले उत्पादन वाढवावयास केव्हांहि राजी आहेत !"

### केंद्रीकरण व विकेंद्रीकरण

"उद्योगधंद्यांचें विकेंद्रीकरण करून खेड्यापाड्यांतून औद्योगिक केंद्रें काढावीत" असे विचारप्रवाह कांहीं ठिकाणीं आढळतात, तर कांहीं ठिकाणीं औद्योगिक वसाहत योजना आंखल्या जात आहेत. तरी यासंबंधीं आपले विचार काय आहेत ?" असा प्रश्न मी विचारला असतां श्री. चांदोरकर म्हणाले, "उद्योगधंदे यशस्वी व्हावयाचे तर अनुकूल ठिकाणीं ते काढावे हेंच श्रेयस्कर ठरतें. ज्या ठिकाणीं कोणताहि कच्चा माल उपलब्ध होत नाहीं अथवा वहातुकीच्या सोयीहि नाहींत किंवा बाजारपेठाहि जवळ नाहींत तेथें कारखाने काढणें अहितकारक ठरेल. अनुकूल जागीं निघालेल्या कारखान्यांशीं अशा कारखान्यांना स्पर्धा करून तग धरतां येणार नाहीं. तेव्हां कोणत्याना कोणत्यातरी गोष्टीची भरपूर अनुकूलता जेथें असेल तेथेंच कारखाना काढावा हें उत्तम ! अशा दृष्टीनें पाहतां उद्योगधंद्यांचें केंद्रीकरण होणें अपरिहार्य आहे." पुढें श्री. चांदोरकर म्हणाले, "खेड्यांकडे जावें हें ठीक. परंतु औद्योगीकरणांत खेडीं ओसच पडतात. जपानमध्यें असेंच झालें. समुद्राच्या कांठाकाठानें वाहतुकीच्या सोयी पाहून औद्योगिक शहरें वसलीं व भरभराटीस आलीं आणि खेडीं लुप्त होत गेलीं. अल्प खर्चांत भरपूर वीजशक्तीचा पुरवठा झाल्याशिवाय खेड्यांतील धंदेही जोरांत चालणार नाहींत. अशा अल्प खर्चांत विजेचा पुरवठा करणें प्रायः सरकारचेंच कर्तव्य ठरतें."

### वसाहत योजना

हल्लीं ज्या कित्येक औद्योगिक वसाहत योजना आंखल्या जात आहेत त्यांचेकडे नंतर आमच्या संभाषणाचा ओघ वळला. श्री. चांदोरकर म्हणाले, "औद्योगिक वसाहती या नागरी वस्तीपासून अगदीं अलग पाहिजेत. कामगारांच्या मुलांचें शिक्षण, रुग्णालयें, क्रीडांगणें, संशोधनमंदिरें, या साऱ्याच गोष्टी वसाहतवाल्यांनीं करावयाच्या तर त्याला भांडवल व वेळ किती लागेल याची कल्पनाच करवत नाहीं. यामुळें वसाहत योजनांची कल्पना स्वागतार्ह असली तरी त्यांच्या अनुषंगिक सुखसोईंच्या भव्य योजना मनोराज्याप्रमाणें अव्यवहार्य वाटतात. कारखानदारांनीं आपल्या सामर्थ्याचा व उपलब्ध वेळेचा विचार करून आपल्या योजना योग्य मर्यादेंतच ठेवणें बरें होईल."

### सरकारचें काम

"शिक्षणाच्या सोयी, रुग्णालयें, वाहातुक साधनें, प्रयोगशाळा, वस्तुसंग्रहालयें, इत्यादि संस्था स्थापन करणें व चालविणें हें सरकारचें काम आहे. या सोयी जेथें असतील तेथें आपले कारखाने कारखानदारांनीं काढावयास हवेत. कारखानदार स्वतःच जर या योजना अंगावर घेऊं लागले तर उत्पादनाचें कार्य कोणी करावयाचें? आणि सरकारला तरी मग काय काम उरतें ? त्यापेक्षां लोकशाहींतील सरकार हेंच अशा योजना आंखण्यासाठीं व पार पाडण्यासाठीं खरे अधिकारी असून त्यालाच सर्वांनीं प्रबळ करणें योग्य होय. स्वतः अशा योजना आंखणें म्हणजे मनोविलासांत दंग होणें व असमर्थ प्रति-सरकारें उत्पन्न करणें होय.

### आनंदानें करभार द्या

"कारखानदारांनीं व प्रजाजनांनीं सरकारला आनंदानें करभार द्यावा व सरकारनें आस्थापूर्वक सार्वजनिक सुखसोयी कराव्या, हेंच लोकशाहींत श्रेयस्कर आहे. सरकारला करभार देण्यास टाळाटाळ करणें लोकशाहींत आत्मघातकीपणाचेंच ठरतें. सरकार कांहीं स्वतः पैसा उत्पादन करूं शकत नाहीं. लोकांनींच स्वखुषीनें सरकारला तो पुरविला पाहिजे."

### सार्वजनिक सोयींसाठीं पैसा

सार्वजनिक सुखसोयींसाठीं एकाच वर्गाला निष्कारण जाचत बसण्यापेक्षां अधिक उत्पादन करून सर्वांच्या श्रमांनीं सरकारला पैसा मिळविता येणें श्री. चांदोरकरांना शक्य वाटतें. त्यासाठीं श्री. चांदोरकरांनीं असा उपाय सुचविला कीं, सरकारनें कारखानदारांना व मजुरांना ८ तासां ऐवजीं १० तास कारखाने चालवावयास लावावे. कामगारांच्या कार्यशक्तीच्या दृष्टीनें ही गोष्ट कांहीं अशक्य नाहीं. लढाईच्या काळांत कामगारांनीं जादा तास कामें सुखानें केलेली आहेत. तेव्हां १० तास काम करावें. त्याबद्दल मजुरांनीं व कारखान्यांतील झाडून साऱ्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनीं नेहमी प्रमाणें ८ तासांचीच मजुरी घ्यावी व उरलेल्या दोन तासांची मजुरी सर्व कामगारांनीं सरकारला द्यावी व त्या दोन तासांत झालेल्या उत्पादनाचा फायदा कारखानदारांनींहि स्वतः न घेता तो सरकारच्या स्वाधीन करावा. अशा रीतीनें सर्वांनीं कष्ट केल्या शिवाय आपल्या नवोदित राष्ट्राच्या प्रगतीस आवश्यक असलेला पैसा आपल्या सरकारला मिळणें सोपें नाहीं.

## सहकारी बँकांचे अहवाल

### दि भुसावळ पीपल्स को. बँक लि.

( वार्षिक सभा: १८-९-४८ )

वरील बँकेचें शेअर भांडवल ८७,५०० रु. असून रिझर्व्ह व इतर फंड १,४७,६१३ रुपयांचे आहेत. ठेवी १६ लक्ष, ३६ हजारांच्या आहेत. एकूण १९ लाखांच्या खेळत्या भांडवलापैकीं ४ लक्ष, ६८ हजार रुपये कर्जाऊ दिलेले आहेत; ७ लक्ष, ३६ हजार रुपये रोख व बँकांत आहेत आणि ६ लक्ष, २५ हजार रुपये इनव्हेस्टमेंट खातीं आहेत. म्हणजे, कर्जाची रक्कम एकूण खेळत्या भांडवलाचे २५% असून बँकेचा पैसा तरता आहे. संशयित व बुडीत कर्जफंड हिशेबांत घेतला, तर थकबाकी पूज्य येते. अहवालाचे वर्षी बँकेस १८,७३८ रु. नफा झाला. ६१⁄४% डिव्हिडंडला ५,४६८ रु. लागतील. ( चेअरमनः श्री. ह. स. खरे, वकील.; मॅनेजर: श्री. जी. जी. देसाई, एफ. आय. एस. ए. ( इं. )

### धुळें अर्बन को. बँक लि., धुळें

( वार्षिक सभा : १९-९-४८ )

अहवालाचे वर्षअखेर वरील बँकेचें शेअर भांडवल १,१५,७२५ रु. झालें आहे आणि रिझर्व्ह फंड ९५ हजारांवर गेला आहे. मागील वर्षी ठेवी थोड्या कमी झाल्या होत्या, परंतु त्या आतां १९४५-४६ चे पेक्षाहि ज्यास्त (७,५३,०१९ रु.) झाल्या आहेत. बँकेनें ५ लक्ष, ८० हजारांची कर्जमागणी पुरविली आहे; ही रक्कम गतवर्षापेक्षा १ लक्ष, ६५ हजारांनीं जास्त आहे. बँकेस १७,३८० रु. नफा झाला. ६१⁄४% डिव्हिडंड देण्यांत येईल. सरकारी रोख्यांचे विक्रींतील नफा ३,२७६ रु. रिझर्व्ह फंड खातीं जमा होईल. ( चेअरमन : श्री. ज. ब. बढगुजर; मॅनेजर : श्री. ए. च. देशपांडे. )

### दि कराड अर्बन को. बँक लि.

( वार्षिक सभा: १९-९-४८ )

बँकेच्या अहवालांत प्रारंभीं बँकेच्या रौप्य महोत्सवापासूनच्या पांच वर्षांच्या ( १९४२-४३ ते १९४७-४८ ) प्रगतीचे आंकडे दिले आहेत. त्यावरून बँकेच्या सेवेचा वेगवेगळया सभासदांना कसकसा फायदा होत गेला, हें उत्कृष्टपणें दिसून येतें. वाढता नफा, वाढतीं कर्जें ( अहवालाचे वर्षी जंगम मालावरील कर्जें पुष्कळच वाढलीं आहेत ), वाढत्या ठेवी, कायम 'अ' ऑडिट वर्ग, वाढता बूड निधी, थकबाकीचें मर्यादित प्रमाण ( कर्ज बूड फंडाची राखीव रक्कम वजा करतां तें प्रमाण फक्त ५% वर येतें ), इत्यादि सर्व बाबतींत बँकेनें आपला लौकिक कायम राखला आहे. कार्यक्षम व्यवहाराचे व उपयुक्त कामगिरीचे आदर्श म्हणून मुंबई सहकारी खात्याच्या ताज्या अहवालांत प्रांतांतील १४ अर्बन बँकांचा उल्लेख आहे, त्यांत कराड अर्बन बँकेचें नांव आहे. अहवालाचे वर्षी बँकेस २४,४२७ रु. निवळ नफा झाला. ६१⁄४% डिव्हिडंडला ७,०५५ रु. लागतील. महात्मा गांधी स्मारक निधीस ५,००० रु. देण्यांत येणार आहेत. बँकेच्या अहवालावरून तिच्या कार्यक्षम कारभाराची कल्पना येते. ( चेअरमनः श्री. पु. पां. गोखले, बी. ए.; मॅनेजर व मॅनेजिंग डायरेक्टर: श्री. सि. कृ. एकांडे. )

### सातारा जिल्हा को. लँड मॉर्गेज बँक लि.

( वार्षिक सभा: १९-९-४८ )

बँकेकडे कर्ज मागणी अर्जांची आवक वाढत असून अहवालाचे वर्षी १,२२,५०० रु. चे ५६ अर्ज बँकेकडे आले. त्यांत बरेचसे अर्ज जमीन खरेदी, विहिरी काढणें, इंजिन खरेदी, इत्यादींबद्दल आहेत. परंतु कायदेशीर व इतर अडचणींमुळें वरिष्ठ बँकेची मंजुरी साल अखेरी मिळवितां आली नाहीं. अहवालाचे वर्षी फक्त १४ अर्जदारांना २२,७०० रु. चें कर्ज दिलेलें आहे. वसुलाचें प्रमाण शे. ७९.४६ म्हणजे गेल्या साल इतकेंच पडत आहे. बँकेनें सुरवातीपासून वरिष्ठ बँकेचा हप्ता कधींही थकविलेला नाहीं. उलट, आगाऊ दिलेल्या वसुलावर तिचेकडून ५९७रु. व्याज बँकेस मिळालें आहे. बँकेस १,९१४ रु. निवळ नफा झाला. म. गांधी फंडास २०१ रु. देऊन १३⁄४% डिव्हिडंड देण्यांत येईल. बँकेच्या वाढत्या कार्यक्षेत्रासाठी सांगली अगर मिरज येथें आणखी ऑफिसें उघडण्याचा बँकेचा विचार आहे. ( चेअरमनः श्री. आ. ना. कल्याणी; मॅनेजरः श्री. एम. एस. पुटाणी. )

### वेंगुर्ला को. अर्बन बँक लि.

वरील बँकेचें वसूल भांडवल आतां ७०,३२५ रु. झालें असून तिचेकडील ठेवींची रक्कम ४,०८,०५२ रु. झाली आहे. ह्या दोन्हीं बाबतींत बँकेनें अहवालाचे वर्षी उत्कृष्ट प्रगति केली आहे. एकंदर कर्जाऊ रक्कम २,६०,७२६ रु. ची ३,४३,२८८ रु. झाली आहे. बँकेचा व्याप वाढला तरी कर्जाच्या सर्व फेडी वक्तशीर झाल्या व खेळतें भांडवल ७१⁄२ लक्ष रुपयांवर गेलें. भाग भांडवल व फंड मिळून बँकेचें स्वतःचें भांडवल १ लक्ष, ३१⁄२ हजार रु. आहे. त्यांत आतां आणखी सुमारें ५ हजारांची भर पडली आहे. बँकेचा 'अ' वर्ग कायम आहे. ९,४६३ रु. नफ्यापैकी ३,१९० रु. ५% डिव्हिडंडला लागले. बँकेची वार्षिक सभा ता. ९ रोजीं झाली. बँकेच्या अहवालांत प्रगतीचे तुलनात्मक आकडे दिले आहेत, ते उद्बोधक आहेत. (चेअरमनः डॉ. बी.एस.नाईक, एम. बी.बी. एस.; मॅ. डायरेक्टर: श्री. डी. डी. शिरसाट, बी. कॉम.)

### सन्मित्र को. अर्बन बँक लि., मुंबई ४

वरील बँकेची वार्षिक साधारण सभा रविवार तारीख १९-९-१९४८ रोजीं दुपारीं ३ वाजतां मुंबई येथें भरणार आहे.

### सांगली येथील सहकारी परिषद

दक्षिणेंतील विलीन संस्थानांतील सहकारी कार्यकर्त्यांची परिषद सांगली येथें ता. २६ सप्टेंबर रोजीं मुंबई प्रांताचे अर्थमंत्री, श्री. मेहता, ह्यांच्या अध्यक्षतेखालीं भरणार आहे.


सातारा जिल्हा को. सु. युनियन बोर्डाच्या विद्यमानें

**सहकारी सेक्रेटरी ट्रेनिंग क्लास**

कराड येथें सदर क्लास ता. १५ सप्टेंबर १९४८ पासून दीड महिना चालेल. सातारा जिल्ह्यांतील व लगतच्या विलीन झालेल्या संस्थानांतील सहकारी संस्थांनीं आपले अन्ट्रेंड सेक्रेटरींना सदर क्लासला पाठवून क्लासचा फायदा घ्यावा. सातारा जिल्ह्यांतील नवीन व अन्ट्रेंड सेक्रेटरींनीही व इतर व्ह. फा. पास झालेल्या उमेदवारांनीं या क्लासचा जरूर फायदा घ्यावा.

| | |
|---|---|
| यु. एन. केसकर, जी.डी.सी.ए. | धोंडजी पांडुरंग पाटील |
| सेक्रेटरी | चेअरमन |
| सातारा जि. को. सु. युनियन बो. लि. | सातारा जि. को. सु. यु. बोर्ड लि. |

## मुंबई प्रांतिक सहकारी बँक लि.

### अध्यक्ष श्री. आर. जी. सरय्या ह्यांचें भाषण

ता. ४ सप्टेंबर, १९४८ रोजीं बँकेच्या वार्षिक सभेंत श्री. सरय्या ह्यांनीं केलेच्या भाषणांतील महत्त्वाचा भाग पुढें दिला आहे.

अहवालाच्या वर्षाचा आढावा घेतांना एक, महत्त्वाचा मुद्दा आपल्या लक्षांत येतो. देशांतील चलनवृद्धीचें अर्थव्यवस्थेवरील दडपण वाढलें, हा तो होय. गेल्या वर्षी ह्याच्या उलट प्रवृत्ति दिसून येत होती. खालील तक्त्यावरून चलनवृद्धीचें देशांतील बँकांच्या व्यवहारावर काय परिणाम झाले ते दिसून येतील.

आकडे लक्ष रुपयांचे

| | खेळतें चलन | शेडयूल्ड बँकांचें देणें | | |
|---|---|---|---|---|
| | | चालू ठेवी | मुदतीच्या ठेवी | एकूण |
| युद्धपूर्वकाल १९३८-३९ (ब्रह्मदेश सोडून) | १७४ | १२४ | १०३ | २२७ |
| जून २९, १९४५ | ११३७ | ६२९ | २३९ | ८६८ |
| जून २८, १९४६ | १३३८ | ७०९ | ३११ | १०२० |
| जून २७, १९४७ | १२२२ | ६६७ | ३४६ | १०१३ |
| जून २६, १९४८ | १३२० | ७८१ | ३३० | ११११ |

चलनवृद्धीवर उपाययोजना करतांना शेतीच्या व्यवसायांतील लोकांच्या हितसंबंधांकडे दुर्लक्ष होणार नाहीं ह्यासंबंधीं काळजी घेतली गेली पाहिजे. त्यांनीं उत्पन्न केलेला माल नियंत्रित दरानें त्यांच्याकडून घेतला गेला तर त्यांना लागणाऱ्या वस्तू तशाच रीतीनें त्यांना पुरविण्यांत आल्या पाहिजेत. तसें न करतां कृत्रिम किंमती त्यांच्यावर लादण्यांत आल्या तर शेतीच्या उत्पादनांत त्यांना स्वारस्य वाटणार नाहीं. देशाच्या उत्पादनांत अन्नधान्य आणि इतर शेतीचा माल ह्यांना सगळयांत अधिक महत्त्व आहे. तेव्हां चलन-वृद्धीवर उपाय करतांना अधिक उत्पादन हाच खरा उपाय आहे ह्या गोष्टीकडे दुर्लक्ष होता कामा नये.

सरकारनें विनियंत्रणाचें धारण स्वीकारल्यामुळें ह्या वर्षी गेल्या वर्षीच्या मानानें जवळ जवळ सर्व प्रकारच्या शेतीच्या मालाच्या किंमती बऱ्याच वाढल्या आहेत. ह्याला गूळ आणि तंबाखू येवढ्या दोहोंचा अपवाद आहे. व्यापारी दृष्टीनें महत्त्वाच्या असलेल्या चार पदार्थांच्या किंमतींत १९४० सालापासून कसा कसा फरक होत गेला तो पुढें दिला आहे.

शेतीच्या मालाच्या भावांत झालेल्या वाढीमुळें जी परिस्थिति निर्माण झाली ती वहातुकींतील अडचणीमुळें अधिकच बिघडली. किंमती वाढल्यामुळें कांहीं व्यापाऱ्यांनीं सांठा करण्याची प्रवृत्ति दाखविली. यामुळें आपल्या बहुतेक शाखांकडे शेतीच्या मालाच्या तारणावर कर्जें मागण्याकडे सभासदांची अधिक प्रवृत्ति होऊं लागली.

| | जून १९४० | जून १९४१ | जून १९४२ | जून १९४३ | जून १९४४ | जून १९४५ | जून १९४६ | जून १९४७ | जून १९४८ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| भुइमुग ( प्र. पल्ला ) | १२ | १० | १३/८ | ३५ | २८ | २७ | ४० | ५० | ६० |
| कापूस ( प्र. गाठ ) | ७२ | ७५ | ५७ | १६० | ८० | ८० | ९० | ९० | १६० |
| गूळ ( प्र. पल्ला ) | १४ | १० | २२ | ४८ | ४५ | ३७ | ४२ | ५२ | ४० |
| भात ( प्र. मण ) | ३ | ४ | ५ | ७ | ७ | ७ | ७ | ७ | १८ |


## लोकसत्ताक राज्यपद्धतीसाठीं सर्वार्पण करण्यास तयार असणाऱ्या हिंदुस्थानांतील प्रजेला त्याच तत्त्वावर आधारलेली विमा कंपनीच खास आवडेल.

: त्यांतून स्वतःचा विमा उतरण्यासाठीं पश्चिम हिंदुस्थानांतील अग्रेसर :

# दि सुप्रीम म्यूच्युअल ॲशुअरन्स कंपनी, लि.

## ह्या कंपनीचीच निवड करणें योग्य होईल.

**कारण**

१९४७ अखेरचें

| | | |
|---|---|---|
| एकूण काम | ... | ३१,८४,००० चे वर |
| स्वीकारलेलें काम | ... | २८,८६,००० चे वर |
| पूर्ण झालेलें काम | ... | २४,६६,७५० चे वर |
| आयुर्विमा निधि | ... | ३,५९,६४८ चे वर |
| खर्चाचें प्रमाण | ... | १४·९ |

जास्त माहितीसाठीं लिहा अगर भेटा.

सेक्रेटरी,
त्र्यं. वा. देशपांडे,
बी. ए., एलएल. बी.

हेड ऑफिस :
८६६ सदाशिव, पुणें २.

मॅनेजर,
व. न. म्हैसूर,
एम. ए., एलएल. बी.

# कृष्णा शुगर मिल्स लि.

## कृष्णा–कित्तूर

**कन्फेक्शनरी सुरू झाली.**

धंद्याच्या वाढीसाठी ठेवी स्वीकारल्या जातात.

**६ क्यु. प्रेफरन्स शेअर्स विक्रीस आहेत.**

विशेष माहितीसाठी लिहा.

पोस्टः–कृष्णा–कित्तूर
जिल्हाः–बेळगांव.

**विंचूरकर अॅण्ड को.**
मॅनेजिंग एजण्टस्.



दि

# बँक ऑफ इंडिया, लि.

स्थापना १९०६

खपलेलें भांडवल :– ३,००,००,०००.
वसूल झालेलें भांडवल :– १,५०,००,०००.
राखीव फंड :– २,००,००,०००.

मुख्य कचेरी :–ओरिएंटल बिल्डिंग्ज, मुंबई.

**इतर शाखा :–** मुंबईः– बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबा देवी व मलबार हिल. **मुंबई नजीकः**–वांद्रें व अंधेरी. **अहमदाबादः**–भद्र (मुख्य शाखा), गांधी रोड, इलिस ब्रिज, माणिक चौक व स्टेशन शाखा. **कलकत्ता :–** क्लाइव्ह स्ट्रीट (मुख्य शाखा), बडा बाजार व चौरंघी स्केअर. **नागपूरः**–किंग्ज वे व इतवारी बाजार. **पुणेंः**– लष्कर व शहर. मद्रास, कोईमतूर, कालिकत, अमृतसर, भुज (कच्छ), जमशेटपूर, जुनागड, कराची, पालनपूर, राजकोट, सुरत, सोलापूर, वेरावल.

**लंडन शाखा :–** १७ मूरगेट, लंडन ई. सी. २.

**न्यूयॉर्क एजंट्स :–**दि चेस नॅशनल बँक ऑफ दि सिटी ऑफ न्यूयॉर्क.


**डायरेक्टर्स :–**सर कासवजी जहांगीर, बॅरोनेट, जी. बी. इ, के. सी. आय. इ. चेअरमन; श्री. अंबालाल साराभाई, सर जोसेफ के. नाइट, मि. दिनशा के. दाजी, श्री. रामनिवास रामनारायण, ना. सर शांतिदास अस्करन, नाइट, मि. महंमद सुलेमान कासम मिठा, सर किकाभाई प्रेमचंद, नाइट, श्री. भगवानदास सी. मेहता, श्री. कृष्णराज एम. डी. ठाकरसी.

**चालू ठेवीचें खातें:**—कांहीं ठिकाणें सोडून रोजच्या रु. ३०० ते रु १ लक्ष पर्यंतच्या शिलकेवर दरसाल द. शें. एकचतुर्थांश रु. व्याज देण्यांत येतें. रु. १ लाखाहून जास्त शिलकेवर खास योजनेनें व्याज दिलें जातें. सहामाही व्याज रु. ५ पेक्षा कमी झाल्यास तें दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग्ज बँक ठेवी योग्य अटींवर स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें. विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते. सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

बँकेसंबंधीं नेहमींचा सर्वसामान्य व्यवहार केला जातो.

**बी. एन्. अटल,** एजंट, पुणें





## अधिक धान्य पिकविण्याची योजना

—यशस्वी होण्यास—

# किर्लोस्कर पंपिंग सेट्स

**हें अमोघ साधन आहे.**

त्याचें सहाय घ्या !

किर्लोस्कर बंधु, लिमिटेड . . . . किर्लोस्करवाडी







हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि घर्वे यांनीं छापिलें व रा. रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास,' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.